**नवी मुंबई महानगरपालिका**
**स्थायी समिती**

**स्थायी समितीच्या दिनांक** 05 ऑक्टोबर 2016 **रोजी भरलेल्या सभेतील मंजुर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे:-**

| | |
|---|---|
| **विषय क्र.**01<br>**दि.**05 **ऑक्टोबर** 2016 | सन 2015-2016 या वर्षाकरिता नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान अदा करणेबाबत, आयुक्तांचे दि.03/10/2016, चे पत्र क्र.नमुंमपा/प्रशासन/आस्था-10/5290/2016. |
| **ठराव क्र.**57 | " महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या नियमित सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, (प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांच्यासह) आणि करार पध्दतीवर वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी, इत्यादी यांना सन 2015-2016 या आर्थिक वर्षाकरिता आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीवर शासनाच्या धर्तीवर सानुग्रह अनुदान आणि आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या रु.15,000/- या ऐवजी रु.16,000/- आणि ठोक पगारावरील, रोजंदारावरील (आरोग्य सेवक), मानसेवी अधिकारी/कर्मचारी यांना मिळणारी एकत्रित रक्कम किमान रु.8000/- किंवा वेतनाच्या 25% रक्कम यापैकी जी जास्त असेल ती रक्कम या ऐवजी रु.8,500/- इतके सानुग्रह अनुदान देण्यास, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय :-** | **उप सुचनेसह मंजूर करुन महानगरपालिकेस शिफारस.** |

...2

| | |
|---|---|
| **विषय क्र.**02<br>**दि.**05 **ऑक्टोबर** 2016 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागासाठी 02 नवीन पिकअप व्हॅन (माल मोटार) वाहने खरेदी करणेबाबत, आयुक्तांचे दि.04/10/2016, चे पत्र क्र.नमुंमपा/वाहन/616/2016. |
| **ठराव क्र.**58 | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. व्ही.इ.कमर्शियल व्हेईकल्स या उत्पादक कंपनीकडून खरेदी करणेसाठी येणाऱ्या अंदाजित खर्चास रक्कम रु.21,71,322/- इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 5 मधील नियम 5 (2) (2) अन्वये याप्रमाणे संमती देण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **संमत.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.**03<br>**दि.**05 **ऑक्टोबर** 2016 | आरोग्य विभागाच्या सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ व ऐरोलीसाठी 02 नवीन रुग्णवाहिका खरेदी करणेबाबत, आयुक्तांचे दि.04/10/2016, चे पत्र क्र.नमुंमपा/वाहन/618/2016. |
| **ठराव क्र.**59 | "उपरोक्त विषयासंदर्भात मे. फोर्स मोटर्स लिमीटेड या उत्पादक कंपनीकडून खरेदी करण्यास आणि त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.21,19,612/- इतक्या खर्चाने करार करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण 5 मधील नियम 5 (2) (2) अन्वये याप्रमाणे संमती देण्यात यावी. " |
| **निर्णय :-** | **संमत.** |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महापालिका सचिव
नवी मुंबई महानगरपालिका

**तयार केले :-**

1) राजेंद्र शा.पवार (मा.नो./लि.) --------

2) अशोक र.देसाई (मा.नो./लि.) --------